# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१०६१/२०२१/अहमदनगर**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| सौ. संगीता विकास सोनटक्के, रा. निशिगंध, कलानगर, गुलमोहर रोड, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर | अधिक्षक, वर्ग-२ शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर |

**सुनावणी दिनांक – ०७/०२/२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित |

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०१/०४/२०२१

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती मिळालेली नाही

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती करण्यात आलेली नाही.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १८/१२/२०२०

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १८/१२/२०२०

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : दि.१७/१०/२०२० रोजीचा अर्ज

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती**

दि.१७/१०/२०२० च्या तक्रार अर्जा संदर्भात आपल्या कडील पत्र क्र.कार्य/३/नमाशा/७०९/२०२०/नगर दि.  /११/२०२० नुसार मला अद्याप मा.सचिव श्री.स.दि.प्र.मं. नगर व मा.शिक्षणाधिकारी (माध्य) हयांचेकडून त्यावर काय कार्यवाही केली. हया संदर्भात माहिती मिळालेली नाही. आपण सदरील तक्रारी अर्जावर काय कार्यवाही झाली ते मला कळवावे.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, वर्ग-२ शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर यांनी दि.३०/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये मुख्याध्यापक, समर्थ विद्या मंदिर प्रशाला (माध्य), सावेडी, अहमदनगर यांना वर्ग करण्यात आला आहे. असे अपीलार्थी यांना कळविण्यात आले आहे.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०५/११/२०२०

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही.

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, अहमदनगर, यांनी दि.१८/१०/२०२१ रोजी सुनावणी घेतली. अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी अधिक्षक, वर्ग-२ शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, अहमदनगर यांनी १० दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी. असे आदेशित करुन प्रथम अपील निकाली काढण्यात आले.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा —**

१) विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी- तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी ३१/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये वर्ग करण्यात आला असे स्पष्ट केले. तसेच अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना माहिती पुरविण्याचे आदेशित करुन प्रथम अपील निकाली काढण्यात आले असेही स्पष्ट केले.

६. **निष्कर्ष —**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणतही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

२) तसेच प्रथम अपील आदेशानुसार देखिल अपीलार्थीना माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येत नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, वर्ग-२ शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलार्थीस त्यांच्या दिनांक १८/१२/२०२० रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी, तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्येनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपीलार्थी यांना पाठवावे.

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक. १०६१/२०२१/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. अ/-३३५८ 22 NOV 2024